महाराष्ट्र शासन

<u>अतितातडीचे</u>

न्यायालयीन बाब

क्रमांक: संकीर्ण-१४१४/प्र.क्र.१४१/विशि-३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ३० डिसेंबर,२०१४.

प्रति,

कुल सचिव,
सर्व अकृषी विद्यापीठ

विषय :- मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि.२८.४.२०१४.

महोदय,

ॲड दिनार सोहनी यांनी यांनी मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना पाठविलेले दि.१७.११.२०१४ चे पत्र व त्यासोबतचे पीआयएल९८/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले दि.२५.२.२०१४ चे आदेश सोबत जोडले आहेत.

२. सदर पत्रान्वये, मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी शैक्षणिक संस्था करत नसल्याचे निदर्शनास आले असल्याचे कळविले असून तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना देण्याबाबत कळविले आहे.

३. मुंबई हायकोर्टाच्या निकालात तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्य शासनास सूचना करण्यात आल्या आहेत. सदर कायद्याच्या कलम ६ नुसार सर्व शैक्षणिक संस्थापासूनच्या १०० मीटर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी आहे. तसेच कलम ६ च्या नियम ३ नुसार सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक आहे. सदर फलकावर, " या संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी असून याचे उल्लंघन करणा-यांवर कायद्यानुसार रु.२००/- दंड आकारण्यात येईल असे नमूद करणे आवश्यक आहे."

तरी सार्वजनिक आरोग्याच्या हिताकरिता आपल्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांना, सदर कायद्याच्या अंमलबजावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

( पा. म. ताकटे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.